# प्रेसनोट

केंद्र शासनाचे दिनांक. १५ जुलै २०१६ च्या अधिसुचनेअन्वये शस्त्र नियम २०१६ लागू करण्यात आला असुन त्यामधील नियम १५ नुसार प्रत्येक शस्त्र परवानाधारकाने यांना शस्त्र परवानाधारक यांची माहिती एनडीएल या प्रणाली मध्ये भरुन युनिक आयडेंटिफिकेशन क्रमांक प्राप्त करुन घेणे बंधनकारक असुन अद्याप ज्या शस्त्र परवाना धारक यांनी यु.आय.एन नंबर प्राप्त केले नाहीत अशा परवाना धारक यांना दिनांक : ३१ मार्च २०१८ पर्यंत युनिक आयडेंटिफिकेशन क्रमांक प्राप्त करुन घेणे बंधनकारक आहे.

तरी पुणे पोलीस आयुक्तालयाचे अभिलेखावरील सर्व शस्त्र परवानाधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, दिनांक : ०१ एप्रिल २०१८ नंतर यु.आय.एन नसलेला शस्त्र परवान्यावरील अग्निशस्त्र अवैध समजण्यात येवून ते जत्प करण्यात येईल. यास्तव यु.आय.एन क्रमांक प्राप्त करुन घेणेकरिता सर्व शस्त्र परवानाधारक यांचेकरिता www.punepolice.gov.in येथे विहित फॉर्म उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर फॉर्ममध्ये माहिती स्वतःची व शस्त्र परवान्यावरील माहिती अचुक भरुन सदर फॉर्म नागरी सुविधा केंद्र, पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर येथे दिनांक ३०/०१/२०१८ रोजीपर्यंत बिनचुक जमा करण्यात यावे. फॉर्म सोबत परवान्याची साक्षांकीत प्रत व आय-डी प्रुफसाठी अधारकार्ड किंवा पासपोर्ट यांचे साक्षांकीत प्रत जोडणे आनिवार्य आहे.